Add

2

✓ 9

क्षय रोग, कॅन्सर इत्यादी दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना आर्थीक मदत देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीओजेस-१२८३/१६७१/स्वासै,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक : २१.११.१९८३.

शासन निर्णय, क्रमांक:पीओजेस १०८२/१६७१/स्वासै, दिनांक ६.९.१९८२ नुसार स्वातंत्र्य सैनिकांना कायम किंवा अंशत: अपंगत्व आल्यास एकरकमी अनुदान रु.२०००/- देण्यात येते. क्षय रोग व कॅन्सर इत्यादी दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना आर्थीक मदत देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने आता अशा प्रकारच्या दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना देखील एकरकमी रु.२०००/- मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

अशा प्रकारची आर्थीक मदत मिळण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या अर्जासोबत अपंगत्वाच्या अथवा रोगाच्या निदानाबाबत व स्वरूपाबाबत, मुंबईमध्ये शासकीय रुग्णालयाच्या अधीक्षकाचे व जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्र किंवा त्यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले खाजगी रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता आहे.

वर नमूद केलेला खर्च लेखाशीर्ष " २८८- सामाजिक सुरक्षा व कल्याण [इ] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम [सी], स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना निवृत्ती वेतन या अर्थसंकल्प शीर्षाखाली मागणी क्रमांक १४" च्या खर्च खाली दाखविण्यात यावा व त्याखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

हे आदेश दिनांक १.५.१९८३ पासून अंमलात येतील.

उपरोक्त योजनान्वये रक्कम मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनुमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २६४२/ईएक्सपी-४, दिनांक २७.१०.१९८३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
[ श्री.दि.भागवत]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

कृ.मा.प...